श्री.संजय माधव वाघ ,व्रणोपचारक ,पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर यांचे गैरवर्तणाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिका-याची नेमणूक करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग.

जिल्हा परिषद आदेश क्र.पसं/आस्था-1/.204/2025
अहिल्यानगर , दिनांक 10/3 /2025

संदर्भ :- 1) या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.पसं/आस्था-1/865/2024 दिनांक 09.09.2024
2) गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था1/1193 2024 दिनांक 8.10.2024
3) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम क्रमांक 6 (3) आदेश.

ज्याअर्थी ,श्री.संजय माधव वाघ व्रणोपचारक,पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी विनापरवानगी गैरहजर राहणे,वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांचा अवमान करणे अशा प्रकारचे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.1 अन्वये,दोषारोप ठेवणेत आले होते.संदर्भ क्र.2 नुसार श्री.वाघ,यांना ज्ञापन बजावल्याची पोहोच इकडील कार्यालयास सादर केली आहे.सबब,त्यांचे विरुध्द न्याय हक्कांचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 च्या तरतुदीनुसार श्री.वाघ यांचे विरुध्द न्याय हक्कांचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.3 चे आदेशात नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेत येत आहे.

त्याआर्थी,मी मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद अहिल्यानगर,उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे.सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणुन सहाय्यक आयुक्त ( चौकशी ) ,नाशिक विभाग,नाशिक यांची नियुक्ती करीत आहे.तसेच विभागिय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा ,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.तसेच चौकशी अधिका-यास संदर्भ क्र.3 मधील सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहुन चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यां संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202503101100011 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 14:50:37
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सहाय्यक आयुक्त , (चौकशी )
विभागिय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग,नाशिक.

2/-सोबत श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचीका 1 ते ४७ या समवेत जोडले आहे.तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत:- श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर
व्दारा:-गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर.
प्रत:- गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर

2/-सोबतचा आदेश श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर,यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सत्वर सादर करावी.

प्रत:- डॉ.संपत सर्जेराव तांबे पशुधन विकास अधिकारी (वर्ग-1) पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर
प्रत:-निवड नस्ती.